आस्थापना: महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाच्या मुंबई मुख्यपीठ व औरंगाबाद, नागपूर आणि पुणे येथील खंडपीठांच्या कार्यालयातील ७१ अस्थायी पदांना दि.०१/०३/२०२३ ते दि.३१/०८/२०२३ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमआरटी २०१८/प्र.क्र.२११/ज-१अ,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० मार्च,२०२३

वाचा :

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, संकीर्ण-१००२/प्र क्र ६६(भाग-२)/ई-८, दिनांक २० मार्च,२००६.
२. शासन निर्णय,महसूल व वन विभाग, एमआरटी १००७/ प्र.क.८३/टी-१, दि. १२ डिसेंबर, २००७.
३. शासन निर्णय क्रमांक : एमआरटी २०१२/ प्र.क्र.३१/टी-१, दि.२७ मार्च, २०१४.
४. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१५/प्र.क्र.८/१६/वित्तीय सुधारणा-१ दि.११ फेब्रुवारी, २०१६.
५. शासन निर्णय क्रमांक : एमआरटी २०१६/ प्र.क्र.६८/टी-१, दि.१९ ऑक्टोबर, २०१६.
६. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/वित्तीय सुधारणा-१ दि.२१ सप्टेंबर, २०१६.
७. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एमआरटी-२०१८/प्र.क्र.१८७/ज-१अ, दि.९ ऑक्टोबर,२०१८.
८. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/ आ.पु.क., दि.१८ ऑगस्ट,२०२२.
९. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एमआरटी २०१८/प्र.क्र.२११/ज-१अ, दि.०७ ऑक्टोबर,२०२२.
१०. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/ आ.पु.क., दि.०८ फेब्रुवारी,२०२३.
११. प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांचे क्र.ममन्या/आस्था/पदांना मुदतवाढ/ २०२३/३९९, दिनांक ३१/०१/२०२३.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता मधील कलम ३१३ आणि ३१४ अनुसार स्थापित महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे मुंबई मुख्यपीठ व औरंगाबाद, नागपूर व पुणे येथील खंडपीठांसाठी विविध संवर्गातील एकूण ७१ अस्थायी पदे प्रशासकीय व न्यायिक कामाकाजासाठी निर्माण करण्यात आली आहेत. सदर पदांची आवश्यकता लक्षात घेता, या पदांना दि.०१/०९/२०२२ ते दि.२८/०२/२०२३ या कालावधीसाठी संदर्भाधिन क्र.९ येथे नमूद शासन निर्णय दि.०७/१०/२०२२ अन्वये मुदतवाढ देण्यात आली होती.

प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांच्या संदर्भाधीन क्र.११ येथे नमूद दि.३१/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र महसूल

न्यायाधिकरणाच्या कामकाजाकरीता सदर **७१ अस्थायी** पदांची पुढील कालावधीकरिताही आवश्यकता असल्याने सदरहू पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

संदर्भाधीन क्र.१० येथील वित्त विभागाच्या दि.०८/०२/२०२३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांचा वापर करुन तसेच, संदर्भाधीन क्र.७ च्या दि.९/१०/२०१८ च्या शासन निर्णयान्वये विभाग प्रमुखांना असलेल्या अधिकारांनुसार खालील अटींच्या अधीन राहून महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाच्या मुंबई मुख्यपीठ व औरंगाबाद, नागपूर व पुणे येथील खंडपीठांच्या प्रशासकीय तसेच न्यायिक कामकाजाकरिता निर्मित **एकूण ७१ अस्थायी पदांना दि.०१/०३/२०२३ ते दि.३१/०८/२०२३** या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे:-

१) महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकरिता निर्मित व मुदतवाढ प्राप्त ७१ अस्थायी पदांमध्ये दि.०१/०३/२०२३ ते दि.३१/०८/२०२३ या कालावधीमध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही.

२) महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकरिता निर्मित व मुदतवाढ प्राप्त ७१ अस्थायी पदे महसूल विभागाद्वारे यापूर्वी दि. २० मार्च, २००६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे निश्चित आकृतिबंधामध्ये समाविष्ट नसल्यास, अशा पदांचा आढावा घेऊन त्या संदर्भातील प्रस्ताव मुदतवाढीच्या कालावधीमध्ये उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता प्राप्त करून पदांच्या आवश्यकतेबाबतच्या कारणमिमांसेसह शासनास पाठवावा.

३) महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यंत्रणेकरिता मंजूर केलेल्या अस्थायी पदांवरील अधिकाऱ्यांच्या /कर्मचाऱ्यांच्या सेवा शासनाच्या पूर्व मंजुरीशिवाय इतर कामांकरिता वापरल्या जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

४) उपरोक्त सर्व अस्थायी पदांवरील पदधारक प्रचलित शासकीय नियमांनुसार प्रवासभत्ता, स्थानिक पूरक भत्ता यासह इतर अनुज्ञेय भत्ते मिळण्यास पात्र आहेत.

५) सोबतच्या **विवरणपत्र-अ** मध्ये दर्शविलेली अस्थायी पदे त्या-त्या संवर्गातील तात्पुरती भर समजण्यात येईल.

६) विभागीय व जिल्हा पातळीवरील सदरहु **एकूण ७१** इतकी **अस्थायी** पदे महसूल विभागाने यापूर्वी निर्गमित केलेल्या **दि. २० मार्च, २००६** च्या शासन निर्णयान्वये निश्चित आकृतीबंधामध्ये समाविष्ट नसल्यास, अशा पदांचा आढावा घेऊन त्याबाबतचा प्रस्ताव मुदतवाढीच्या कालावधीमध्ये

उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता प्राप्त करुन घेण्याकरीता संबंधित कार्यालयाने या विभागास (कार्यासन ई-८) सादर करण्यात यावा.

(७) सदर पदांसाठी होणारा खर्च हा -"मागणी क्रमांक सी-४, २०५२- सचिवालयीन सर्वसाधारण सेवा (००) (०९९) महसूल मंडळ, (००) (०१) महसूल मंडळ (२०५२ ०२२१)" या लेखाशीर्षाखाली सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०३१०१६५९०८०३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNIL S KOTHEKAR

Digitally signed by SUNIL S KOTHEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=a4e83b3f4c3a086b626255c2b2cb37acdeb67b59b5e9ecbb4d25b60ccef2c660, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=C55205CA6D1113BFAEC735BD2D1C5326D6B007C5CD3A46A6E4C4857E58AD2AFE, cn=SUNIL S KOTHEKAR
Date: 2023.03.13 19:25:27 +05'30'

(सुनिल कोठेकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत अग्रेषित :-

(१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
(२) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
(३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
(४) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
(५) अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई.
(६) विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नागपूर व औरंगाबाद.
(७) प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई.
(८) उपप्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, औरंगाबाद/नागपूर/पुणे
(९) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
(१०) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
(११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
(१२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
(१३) वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/वित्तीय सुधारणा), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
(१४) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
(१५) ई-८ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
(१६) निवडनस्ती, ज-१ अ कार्यासन,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विवरणपत्र- अ

शासन निर्णय क्रमांक: एमआरटी २०१८/प्र.क्र.२११/ज-१अ, दि.१० मार्च,२०२३ सोबतचे सहपत्र.

अ. क्र.	संवर्ग	वेतन मॅट्रीक्स व स्तर	एकूण मंजूर पदांची संख्या	अस्थायी पदांची संख्या	अस्थायी पदांवरील वार्षिक वित्तीय भार	शेरा
१.महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे मुंबई येथील मुख्यपीठ						
१	अध्यक्ष	११२५००	१	१	२०७१०००	
२	सदस्य (न्यायिक)	२८२३५	१	१	११२१६००	
३	सदस्य (प्रशासकीय)	९१३५०	१	१	१३८२५६०	
४	प्रबंधक	५६१००-२१२४०० एस-२०	१	१	२२४८०००	वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळाला असल्यामुळे त्यांना एस-२३ नुसार वेतन अदा करणेत येत आहे.
५	उपप्रबंधक	५५१००-१७५१०० एस-१९	१	१	१२००८९२	
६	लघुलेखक (निम्नश्रेणी)	३८६००-१२२८०० एस-१४	२	२	२०१९४०८	१ पद रिक्त
७	अव्वल कारकून	३२०००-१०१६०० एस-१२	६	६	५३३०४७२	२ अव्वल कारकून यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळाला असल्यामुळे त्यांना एस-१४ नुसार वेतन अदा करणेत येत आहे.
८	लिपीक-टंकलेखक	१९९००-६३२०० एस-६	६	६	३६७०४१६	
९	वाहनचालक	१९९००-६३२०० एस-७	१	१	६८८४२४	
१०	दप्तरी	१६६००-५२४०० एस-३	१	१	६६९८१२	वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळाला असल्यामुळे त्यांना एस-६ नुसार वेतन अदा करणेत येत आहे.
११	शिपाई	१५०००-४७६०० एस-१	५	५	३५०६०००	वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळाला असल्यामुळे ३ शिपायाला एस-६ नुसार व २ शिपायाला एस-३ नुसार वेतन अदा करणेत येत आहे.
	एकूण		**२६**	**२६**	**२३९०८५८४**	

२.*महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे पुणे येथील खंडपीठ*						
अ.क्र.	**संवर्ग**	**वेतन मॅट्रीक्स व स्तर**	**एकूण मंजूर पदांची संख्या**	**अस्थायी पदांची संख्या**	**अस्थायी पदांवरील वार्षिक वित्तीय भार**	**शेरा**
१	सदस्य (न्यायिक)	३८३०५	१	१	१६५३८३६	
२	सदस्य (प्रशासकीय)	९९८००	१	१	२०६१९६८	
३	उपप्रबंधक	७२०००/- वेतन वाढ ७४२००/-	१	१	१४७७२३८	
४	लघुलेखक (निम्नश्रेणी)	३८६००-१२२८०० एस-१४	२	२	२९१४७४७	वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळाला असल्यामुळे एस-१५ नुसार वेतन अदा करणेत येत आहे.
५	अव्वल कारकून	३२०००-१०१६०० एस-१२	३	३	२४९७६२०	१ पद रिक्त
६	लिपीक-टंकलेखक	१९९००-६३२०० एस-६	३	३	१५८१६७२	
७	दप्तरी	१६६००-५२४०० एस-३	१	१	७१६१०८	पद रिक्त
८	शिपाई	१५०००-४७६०० एस-१	३	३	१८२३३५५	वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळाल्यामुळे १ शिपायाला एस-३ व १ शिपयाला एस-४ नुसार वेतन अदा करेणे येत आहे.
	एकूण		**१५**	**१५**	**१४७२६५४४**	

३. *महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे औरंगाबाद येथील खंडपीठ*						
अ.क्र.	**संवर्ग**	**वेतन मॅट्रीक्स व स्तर**	**एकूण मंजूर पदांची संख्या**	**अस्थायी पदांची संख्या**	**अस्थायी पदांवरील वार्षिक वित्तीय भार**	**शेरा**
१	सदस्य (न्यायिक)	३३६०५	१	१	३२१६०००	पद रिक्त
२	सदस्य (प्रशासकीय)	७०८००	१	१	३२१६०००	पद रिक्त
३	उपप्रबंधक	५५१००-१७५१०० एस-१९	१	१	३९०३३००	
४	लघुलेखक (निम्नश्रेणी)	३८६००-१२२८०० एस-१४	२	२	१०४११८५२	१ लघुलेखक यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळाला असल्यामुळे त्यांना एस-१५ प्रमाणे वेतन अदा करणेत येत आहे.
५	अव्वल कारकून	३२०००-१०१६०० एस-१२	३	३	११८०२३५६	
६	लिपीक टंकलेखक	१९९००-६३२०० एस-६	३	३	९१४१८९२	
७	दप्तरी	१६६००-५२४०० एस-३	१	१	२११४९०४	
८	शिपाई	१५०००-४७६०० एस-१	३	३	६३४४७१२	
एकूण			**१५**	**१५**	**५०१५१०१६**	

४.*महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे नागपूर येथील खंडपीठ*						
अ.क्र.	**संवर्ग**	**वेतन मॅट्रीक्स व स्तर**	**एकूण मंजूर पदांची संख्या**	**अस्थायी पदांची संख्या**	**अस्थायी पदांवरील वार्षिक वित्तीय भार**	**शेरा**
१	सदस्य (न्यायिक)	३८२२५ + मुळ वेतनावर ३०%	१	१	१५६३२६४	
२	सदस्य (प्रशासकीय)	७५७००	१	१	१३३०४३५	
३	उपप्रबंधक	५५१००-१७५१०० एस-१९	१	१	१४४१८१४	
४	लघुलेखक (निम्नश्रेणी)	३८६००-१२२८०० एस-१४	२	२	२०१०२४१	
५	अव्वल कारकून	३२०००-१०१६०० एस-१२	३	३	३१०१५७३	
६	लिपीक टंकलेखक	१९९००-६३२०० एस-६	३	३	१६४७८५०	
७	दप्तरी	१६६००-५२४०० एस-३	१	१	७७९८४६	वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळाला असल्यामुळे त्यांना एस-६ नुसार वेतन अदा करणेत येत आहे.
८	शिपाई	१५०००-४७६०० एस-१	३	३	१६४०४३५	
	एकूण		**१५**	**१५**	**१३५१५४५८**	
	एकूण		**७१**	**७१**	**१०२३०१६०२**	